स्थापना — २२ जून १९६० नोंदणी क्र.—२४०९५ RBI-L.NO.-UBD/MH/956 P Date – 31/12/1987

# डॉ. आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि, जयसिंगपूर

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदाकरीता)**

डॉ.आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर (ता. शिरोळ) या बँकेची सन २०१८—२०१९ ची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २०.०९.२०१९ इ. रोजी दुपारी ठिक ०२.०० वाजता, मर्चंट असोसिएशन हॉल, ९ वी गल्ली जयसिंगपूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकरीता बोलविणेत येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक २०.०३.२०१९ इ. रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.
२. मा.संचालक मंडळाने दिनांक ३१.०३.२०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा शासकीय लेखापरीक्षकांनी सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा—तोटापत्रक स्वीकृत करणे.
३. सन २०१७—२०१८ या सालाचे शासकीय लेखापरीक्षण दोष दुरूस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
४. मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१९—२०२० चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०१८—२०१९ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.
५. सन २०१८—२०१९ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
६. सन २०२०—२०२१ या वर्षाकरीता अंतर्गत व कंकरंट हिशोब तपासणीस यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.
७. सन २०१९—२०२० या वर्षाकरीता शासकीय लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.
८. सन २०१८—२०१९ या सालातील शासकीय लेखापरीक्षक सी.ए. मे. पोवार सामंत आणि जाधव यांचेकडून मिळालेला लेखापरीक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
९. बँकेच्या मा.संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना सन २०१८—२०१९ या सहकारी वर्षात दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
१०.सन २०१९—२०२० या वर्षाकरीता बाहेरील भांडवल उभारणेची कमाल मर्यादा ठरविणे.
११.सन २०१८—२०१९ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजूरी देणे.
१२.दि. २० मार्च २०१९ इ. रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मल्टीस्टेट विषयी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन निर्णय घेणे.
१३.मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मंजूरी देणे.
१४.बँकेच्या सभासदाना प्रशिक्षण देणेबाबत विचार विनिमय करणे.
१५.बँकेने केलेल्या व करावयाच्या भांडवली गुंतवणूकीस मान्यता देणे.
१६.सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस रजा मंजूर करणेबाबत विचार करणे.
१७.मे.अध्यक्षसोा यांचे परवानगीने आयत्यावेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

**मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार**

स्थळ — जयसिंगपूर **श्री.व्ही.ए.कदम**

दि. २२.०८.२०१९ **प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सूचना :**

१. बँकेच्या कामकाजासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदांनी दिनांक १६.०९.२०१९ पूर्वी बँकेकडे लेखी कळवावे.
२. गणपुर्ती अभावी सभा तहकुब झालेस त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.
३. आपला पत्ता बदलला असलेस नविन पत्ता प्रधान कार्यालयाकडे त्वरित कळवावा. तसेच लाभांश बँकेच्या कामकाजाच्या वेळेत घेऊन जावे.
४. सभासदांनी आपला लाभांश जमा करणेसाठी नजिकच्या शाखेत त्वरित सेव्हींग खाते सुरू करावे. तसेच तीन वर्षावरीत डिव्हीडंड जे सभासद दि. ३१.१२.२०१९ पर्यंत नेणार नाहीत. अशा सभासदांचे डिव्हीडंड रिझर्व्ह फंडस वर्ग केले जाईल.
५. अहवालाच्या व हिशोब पत्रकाच्या प्रती प्रधान कार्यालयात व शाखा कार्यालय येथे सभासदांचे माहितीसाठी ठेवणेत आलेल्या आहेत. तसेच या www.jusbbank.com वेबसाईट वर बँकेचा अहवाल पाहावयास मिळेल.